# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०– २५६२११५६
२५६२११५७
२५६२११६१
२५६२११६३

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
वेबसाइट : www.unipune.ac.in
ईमेल : approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/ 2055

दिनांक : 30/9/2021

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,

पुणे, अहमदनगर व नाशिक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करीता तदर्थ/सी.एच.बी. स्वरूपात नियुक्त अध्यापकांच्या Continuation मान्यतेबाबत

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र. सीसीओ/१०२०, दि. २३ जून, २०२१

२) या कार्यालयाचे पत्र क्र. सीसीओ/११३२, दि. ०७ जुलै, २०२१

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालयातील ज्या अध्यापकांना शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये तदर्थ म्हणून शिक्षक मान्यता देण्यात आलेली आहे. अशा अध्यापकांना संबंधित महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी तदर्थ स्वरुपात नियुक्त करून त्यांचे शिक्षक मान्यतेसाठीचे (Continuation) प्रस्ताव दि. ३१ जुलै, २०२१ पर्यंत सादर करण्याबाबत संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये तदर्थ शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहित प्रक्रियेने सादर करण्यासाठी दि. ३० सप्टेंबर, २०२१ अखेरपर्यंत मुदत देण्यात आलेली होती.

यासंदर्भात काही महाविद्यालयांकडून विद्यापीठास शिक्षक मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ मिळावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करिता तदर्थ स्वरुपात नियुक्त केलेल्या अध्यापकांचे शिक्षक मान्यतेचे Continuation प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी तसेच तदर्थ (Adhoc) स्वरुपात नियुक्त/तासिका तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. १४ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | तपशिल | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम दिनांक | ऑनलाईन अर्ज भरावयाची मुदत दिनांक | सर्व संबंधित कागदपत्रांसह प्रस्ताव विद्यापीठात सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | Continuation Approval | दि. ३१ जुलै, २०२१ | दि. १४ ऑक्टोबर, २०२१ | — |
| २ | तदर्थ मान्यता (Adhoc) / तासिका तत्वावरील नियुक्ती (C.H.B) | दि. ३० सप्टेंबर, २०२१ | दि. १४ ऑक्टोबर, २०२१ | दि. २३ ऑक्टोबर, २०२१ |

कळावे,

आपला,

30/9/2021

(मुंजाजी रासवे)

उपकुलसचिव